
विलास वैद्य यांची कविता

# एक सर्जनशोध

(माझ्या प्रयोगशील देशात)

**संपादक : डॉ. कमलाकर चव्हाण**



Publication Number

567

ISBN NO : 978-81-951082-7-5

**विलास वैद्य यांची कविता : एक सर्जनशोध**

(माझ्या प्रयोगशील देशात) (संपादन)

संपादक– **डॉ. कमलाकर चव्हाण**
'शब्दगंध' वैष्णवीनगरी, तरोडा (खु.), नांदेड
मो : ९४२१३८१३५०

प्रकाशक
**दत्ता डांगे**
इसाप प्रकाशन,
'कांचनब्रह्म'
१९०, सहयोगनगर
नांदेड – ४३१ ६०५
भ्र. ९८९००९९५४१

मुद्रक
**आर्टी ऑफसेट प्रिंटर्स, लातूर**

प्रथमावृत्ती : **२६ जानेवारी २०२१**

सर्वाधिकार : **सौ. सुलभा वैद्य**

मुखपृष्ठ
**संतोष घोंगडे, पुणे**

आतील रेखाटने : **भ. मा. परसवाळे**

अक्षरजुळणी : **सौ. कलावती घोडके**
**कृष्णा डी.टी.पी. आर्टस्, नांदेड**

मूल्य : २५० /– रुपये

**Vilas Vaidya Yanchi Kavita : Ek Sarjanshodh**

(Majhya Prayogshil Deshat) (Edition)

Dr. Kamlakar Chavan
'Shabdagandh' Vaishnavinagari
Torada (Kh.), Nanded
Mob : 9421381350

Published By
**Datta Dange**
Esap Prakashan,
'Kanchanbramha'
190, Sahayog nagar
Nanded - 431 605
Mob : 9890099541

Printing Press
**Arty Offset Printer's Latur**

First Edition : **26 January 2021**

© **Sow. Sulbha Vaidya**

Cover Design
**Santosh Ghongde, Pune**

Type Setting : **Sow. Kalavati Ghodke,**
**Krishna D. T. P. Art's, Nanded**
Mob : 9545351820

**Price :** Rs. -250 /-

(या ग्रंथातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

१४. समाजमनाला अंतर्मुख करणारी कविता : 'माझ्या प्रयोगशील देशात' • डॉ. कमलाकर चव्हाण / ६

१५. 'माझ्या प्रयोगशील देशात'मधील अंतर्मुख चिंतनशीलता • प्रा. डॉ. मा. द. सोनवळे / ७

१६. विलास वैद्य यांच्या कवितेतील अल्पाक्षरत्व • प्रा. डॉ. पंडित आनंदराव शिंदे / ८

१७. हृदय हेलकावून सोडणारी कविता • सुधाकर तुकारामपंत कुलकर्णी / ८

१८. सत्यनिष्ठतेला बळ देणारी कविता : 'माझ्या प्रयोगशील देशात' • प्रा. जयप्रकाश पाटील / ८

१९. 'माझ्या प्रयोगशील देशात' : कोलाहल मनामनांचा • प्रा. डॉ. त्र्यंबकटी पावडे / ९

२०. समाजरचनेच्या पुनर्बांधणीचा आशावाद : 'माझ्या प्रयोगशील देशात' • डॉ. महेश मंगनाळे / ९८

२१. अस्वस्थ वर्तमानाची कविता : 'माझ्या प्रयोगशील देशात' • प्रा. खंडेराव भिसे / १०७

२२. परिवर्तनाची आस असलेली कविता : 'माझ्या प्रयोगशील देशात' • राजू रणवीर / ११२

'माझ्या प्रयोगशील देशात' मधील निवडक कविता – / ११७

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Dist. Parbhani

# 'माझ्या प्रयोगशील देशात' मधील अंतर्मुख चिंतनशीलता

प्रा. डॉ. सा. द. सोनसळे

कवी प्रा. विलास वैद्य यांचा 'माझ्या प्रयोगशील देशात' हा निर्मल प्रकाशनाने प्रकाशित केलेला कवितासंग्रह नुकताच वाचण्यात आला. सभोवती कोलाहल माजलेल्या वास्तवात मन स्वतःचा शोध घेऊ लागले. तर स्वतःचा चेहरा हरवलेला आपला देश माझ्याही नजरेसमोरून सरकत जात असताना दिसतो. आपल्याच अस्तित्वाच्या खुणा पुसून टाकत दगाबाजांना आपण रस्ता पुसत आहोत. बुद्धाची अहिंसा, सत्य, करुणा, प्रज्ञा आम्ही गमावून बसलो, तेव्हापासून माणुसकी अंकुरतच नाही. सातत्याने या मातृभूमीवर वेगवेगळे आक्रमक येऊन हुकमत गाजवत राहिले. सातत्याने शोषण करत राहिले. आम्ही हतबल झालेले भारतीय ही घुसमट सहन करीत राहिलो. याला कारणही आहे. एकतेच्या आणि एकात्मतेच्या घोषणाबाजी करताना कमालीचे सामाजिक अंतर राखून एकमेकांच्या बोकांडी बसण्याचे पराक्रम केले. अजूनही करत आहोतच. या देशाच्या पवित्र मातीला विषमतेच्या विषात कालवून मुद्दामहून बदनाम केले. या देशाच्या दास्य आणि गुलामीला या देशाचा भूतकाळ अधिक कारणीभूत आहे. भूतकाळातील जाती अहंकाराचे तिढे जोपर्यंत सुटणार नाहीत. तोपर्यंत वर्तमानकाळ नीट जगता येणार नाही आणि भविष्य तर अंधारमयच राहील. कोणत्याही सुज्ञ माणसांनी विषमतावादी मुजोर धर्मग्रंथ नाकारले पाहिजेत. परंतु, धर्माचे ठेकेदार आपली पकड तसूभर ढळू देत नाहीत. हा बेरकीपणा उघड करण्याचे सामर्थ्य विलास वैद्यांच्या कवितेने उजागर केले आहे. वैद्यांचे 'गलफ', 'आलाप' या आधीचे दोन कवितासंग्रहही वाचले आहेत. या दोन्ही कवितासंग्रहातील अभिव्यक्तीची शैली याही कवितासंग्रहात आहे. पण आशयघनता मात्र निरशा दुधासारखी घट्ट आहे. कुठल्याही प्रतिमा, प्रतीकाचा फारसा वापर न करता सर्वसामान्य माणसाच्या अंतःकरणाला स्पर्श

करणारी त्यांची कविता आहे. ते स्वतःच्या कवितेविषयी आणि स्वतःच्या शब्दांविषयी त्यांनी अतिशय सुंदर मांडले आहे. ते आपल्याच कवितेविषयी म्हणतात,

**'अंधार चिरून बाहेर पडलेली**
**प्रकाशाची एकजिनसी तिरीप**
**माझी कविता.'**

सभोवती गडद अंधार आहे आणि त्या अंधाराला प्रत्युत्तर देत त्या गतानुगतिकतेच्या अंधाराला कापत प्रकाशमान होऊन माझी कविता उगवते हा जोमदार प्रवास अधोरेखित करते. अंधाराला घाबरून पोबारा करणारी आमची वृत्ती नाही हेसुद्धा यामधून कवी व्यक्त करतो आहे. तर शब्दाबद्दल ते कमालीचे जागरूक आहेत. बोललेल्या शब्दांचे गैरअर्थ पुढेपुढे होत जातात आणि आपण इतरांकडे सोपवलेले शब्द अनंत यातनामय दुःख देतात. जे शब्द आपण निष्पाप निर्मळ अंतःकरणांनी मांडलेले असतात. या कवीच्या नितळ अंतःकरणाची साक्ष त्यांची कविता देते. ही कविता वास्तवाचे सजग भान देत दुःखाच्या प्रत्येक किनाऱ्यांना स्पर्श करत जाते. मुक्या माणसांचे प्रतिनिधीत्त्व करणारी ही कविता मानवी कल्याणाचा ध्यास घेणारी आहे. माणूस डोळे आणि मन गहाण टाकून कुठेच दूर पळू शकत नाही. म्हणजेच वास्तवापासून दूर जाता येत नाही. ही जाणीव घेऊन या संग्रहाची सुरुवात होते. मनात नसतानासुद्धा बळेच हिरमुसून हसावे लागतं हे सत्य आहे.

**'कधी या जमावाकडे पाहून**
**हिरमुसल्यावाणी होऊन हसणं**
**कधी त्या जमावाकडे पाहून**
**हिरमुसल्यावाणी होऊन हसणं.'**

ही जीवनात आलेली अवरुद्धता मोठी बोलकी आहे. राजकारणाची ही सत्यता आहे. जे स्वातंत्र्यासाठी लढले त्यांची स्मारकं अपमान सहन करत उभे आहेत. त्या विरोधात इथला खोटा वारा, वादळ काहीच करत नाही. तो हताश झाला आहे. परिवर्तनवादी विचारधारा गप्प बसलेली आहे. यावरील हे भाष्य मोठी मार्मिकता प्रगट करते.

**'तडा गेलेला स्पष्ट दिसत असताना**

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

माणसांच्या मनामनाला
तरीही केवढ्या भरजरी वेशभूषेत
लोक जमा होत आहेत समारंभाला
हा कसला आदेश, हे कसले फर्मान
क्षणार्धात...टाळ्यांच्या कडकडाटात
जाळून टाकल्या जात आहे.
परस्परातील बंधुभाव.'

दिवसे-दिवस बेचिराख होत असलेला माणूस अन्याय, जुलमांच्या विरुद्ध बोलतच नाही. उलट तो गुलामगिरीचे उत्सव मोठ्याप्रमाणावर भरवत आहे. हे गुलामांचे तोंड दिवसागणिक वाढत आहेत. मालकांना सलामी ठोकत आहेत. हे जीवनतील अपरिहार्यता चित्रित करीत आहे. खऱ्या माणसांना सतत अपमानित होऊन जगावं लागतं. ज्ञानी माणसांची हतबलताही प्रत्ययाला येत आहे. एकीकडे हे सत्य असताना 'ग्लोबल'चे बिगूल वाजले आणि खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या विळख्यात आम्ही सापडलो आहोत. गोड बोलणाऱ्या परकीयांसाठी त्यांच्या व्यापार उदिमासाठी आम्ही यत्तदेशीयांचे उद्योगधंदे बंद करत आहोत. त्यांना बेरोजगार करत आहोत. हे १९९० नंतरच्या आमच्या प्रयोगामध्ये आम्ही कसे फसत चालले आहोत, ही जाणीव कवी मोठ्या चिंतनगर्भ शैलीत मांडतो,

**'गोड बोलण्याचे प्रशिक्षण घेऊन**
**गतीने व्यापार वाढविणाऱ्या**
**सुंदर आकर्षक चेहऱ्यासाठी**
**ते रिकाम्या करून देत आहेत**
**त्याग बलिदानाच्या अनमोल जागा**
**माझ्या प्रयोगशील देशात.'**

सामाजिक दंगली, उग्र धार्मिकता इथले मूलतत्त्ववादी माणसं मांडत आहेत. भ्रष्टाचाराचा उग्र दर्प येत आहे. आपल्याच देशाची, आपल्याच समाजाची किळस यावी. ही सुजत चाललेली श्रीमंती माणुसकीचा चक्काचूर करत आहे. ही भयाकुलता माणसांचे, समाजाचे सर्वांग व्यापून टाकते आहे. जात, धर्म आणि द्वेषाचे ओरखडे दररोज निघत आहेत. सर्वसामान्य माणूस पोटाची खळगी भरण्यासाठी

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

अहोरात्र धडपडत असताना कवी मनापासून त्यांच्या भावना काळाच्या भाळावर कोरत आहे. समाजातील हुजरेगिरी करणारे मात्र शोषकांना चंद्र सूर्याची उपमा देतात. हा मतलबीपणासुद्धा रोखठोक मांडतात. मात्र शोषण करणारे इतरांचे जीवनच हिरावून घेत आहेत. इतरांची प्रगती त्यांना खटकणारी आहे. या मातीला स्वतंत्र करताना किती हुतात्म्यांनी बलिदान दिले आणि त्या हुतात्मावरच जणू कुणी जाती, अहंकाराचे लोक हक्क गाजवू लागले आहेत. हे लांछनास्पद आहे. वैद्य लिहितात,

**'समरगीतावर हक्क दाखविण्यासाठी**
**केवढी विष पेरायला केलीय सुरुवात.'**

यामुळे जे मानवतेच्या रचनेचे सुदंर कार्य आहे, त्याचा तळच हरवून जात आहे. माणसांची क्षणाक्षणाला रूपंही बदलत आहेत. ही सूचकता कवी अतिशय सुंदरीत्या अधोरेखित करतात. तपश्चर्येला बसले की, आध्यात्मिक संत, जुगाराच्या अड्ड्यावर धूर्त यशवंत, कधी परखड विचारवंत तर कधी व्यसनाधिन या प्रत्येक भूमिकेला लबाड माणसांना बक्षीस, पारितोषिक मिळत आहेत. यामुळेच कदाचित शोषण करणारा खरा गुन्हेगार समाजाला सापडत नाही.

**'माणसांकडे झेपावणे काय कामाचे?**
**जाती–जातीच्या थांब्यावरून**
**ये–जा करतात.**
**परस्परातील भावबंध.'**

या क्रूर विळख्यात सापडलेला आपला समाज पारंपरिकतेच्या चक्रात अडकला आहे. व्यक्तिपूजेखातर तो आपल्यावर अन्याय करणाऱ्या भ्रष्टाचारी माणसालाच आपला उद्धारकर्ता समजून बसला आहे. निवडणुकीच्या दरवेळीच्या हंगामात दिलेली आश्वासनं पूर्ण होतील म्हणून,

**'नुसती प्रतीक्षा येते वाट्याला**
**केवढे हे भयानक चित्र**
**जीवलगाच्या भेटीच्या आनंदात**
**झोपडी झोपडीतून**
**उपाशीपोटी बाहेर पडताहेत हे लोक**
**या लुटारूंच्या उत्स्फूर्त स्वागताला'**

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

धनिक अधिक श्रीमंत होत आहे. हा चढता आलेख श्रीमंतीचा देशाच्या सीमा भेदून समुद्रापार जात आहे. ही चतुरता स्पष्ट करताना कवीने अंतर्गत दुहीसुद्धा जोमाने वाढत आहे; यामुळे भविष्यात यादवींचे संकट येऊ शकते ही सूचना कवी देतो.

'समूहनृत्यात बेभान झालेला
एक तांडा त्यांच्या समर्थकांचा
इथल्या वर्दळीसाठी
कायम संकट बनत चालला आहे.'

त्यामुळे महानगरातून होणारे बॉम्बस्फोट, दंगल ही दबा धरून बसलेली क्रूर मानसिकता उसळी मारून येते. सर्वसामान्यांच्या जीवनाची राखरांगोळी करते. ही क्रूरता सामाजिक आरोग्य धोक्यात आणत असल्याचे कवी सूचित करतो आहे. खोट्या, लबाड माणसांच्या जगण्यालाच आम्ही मोठेपणा देत आहोत. त्यामुळे,

'मधल्या पळवाटांचे
हमरस्त्यात
केव्हा झालं रूपांतर
काही कळलेच नाही.'

अशा नव्या संकटात आपल्या देशाचे भवितव्य अडकून पडले आहे. ही भयाकुलता कवी व्यक्त करतो. जीवन पिळवटून टाकणारी दुसरी जखम नित्यनव्याने चिघळत आहे. तिला नजरेआड करून जगावं लागतं. काय सत्य समजावे एवढे संभ्रम आहेत. म्हणून वैद्य लिहितात,

'केवढे हे नाट्य
डोळ्यातून
ठिबकतात अश्रू
अन् रडता गळा
कटकारस्थानात
सामील...'

अशा बेभरवशाच्या वास्तवाला कसे अधोरेखित करावे हाच मूळ प्रश्न आहे. धर्माची आदिम जाणीव घेऊन जगणारा समाज माणसांच्या वाटा अडवतो. शोषणकर्त्याला सलाम करणारा समाज आपलेच अस्तित्व पुसून टाकतो आहे.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

दररोजची वाढणारी बेरोजगारी, माणुसकीचा झालेला कोंडमारा, राज्यकर्त्यांचा बेरकीपणा हे आमचे वास्तव असताना कवी मात्र अंतर्मुख व्हायला लावतो. तुफानाला निमंत्रण देणारा हा कवी सभोवतीच्या वास्तवाने अस्वस्थ आहे. हीच अस्वस्थता या बकाल जीवनाला वाचा फोडणारी ठरेल असे मनस्वी वाटते. कविता नेमकी, नेटकी आहे. या संग्रहातील सर्वच कविता मानवी दुःखावर त्यांच्या कोतेपणावर, त्याच्या हिरमुसलेपणावर नेमकेपणाने बोट ठेवतात. कमीत कमी शब्दात खऱ्या वास्तवाला भिडवणारी उद्याच्या संघर्षासाठी मैदान निर्माण करणारी आहे. जीवनात आलेली विसंगतीही मोठ्या मार्मिकपणे चित्रित करते. कुणाचाही मुलाहिजा न ठेवणारी या संग्रहातील कविता नव्या कवींचा महामार्ग होईल ही अपेक्षा.

■■

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani